## व्यवसाय / धंधा

**अभिषेक मार्केटिंग येथे होलसेल** भावात बेकरीचे माल मिळेल. १० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड, बनपाव, क्रिमबन, क्रीमरोल ७.५० रु. २० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ६ नग कपकेक, बिस्किट, ब्रेड, क्रिमबन १५ रु. मिळेल. ३० रु विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड २२.५० पैसे. ४० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी ३० रु मिळेल. तुळजापूर वेस, गोल तालीम जवळ, सोलापूर.

**मो: ९४२२६५११०१**



दैनिक सोलापूर — असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



**नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...**

दारू... अंमली पदार्थ... गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)

**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**

फोन: 9552619752

कॉल/व्हॉटसॲप करा... दारू... अंमली पदार्थ... राम राम करा...

501% रिझल्ट



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक २७१ वा | मंगळवार, दि. १० जून २०२५ | पाने ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# देशाच्या हवाई क्षेत्राशी सोलापूर जोडल्याने आर्थिक विकासाला चालना मिळणार- खा. मुरलीधर मोहोळ

- केंद्रीय विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ व पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते सोलापूर विमानतळ येथून फ्लाय 91 विमान कंपनीच्या विमानाला झेंडा दाखवून विमान सेवेचा शुभारंभ करण्यात आला
- ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात सोलापूर ते मुंबई विमान सेवा सुरू करणार
- उड्डान योजनेअंतर्गत सोलापूर येथून तिरुपती, हैदराबाद व बेंगलोरला विमान सेवा सुरू करणार



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** आजचा दिवस हा सोलापूरकरांसाठी ऐतिहासिक दिवस आहे. आज सोलापूर विमानतळ येथून सोलापूर ते गोवा ही विमान सेवा सुरू होत आहे. त्यामुळे सोलापूर जिल्हा हा देशाच्या हवाई क्षेत्राशी जोडला गेला आहे. यातून सोलापूर जिल्ह्याच्या आर्थिक विकासाला मोठ्या प्रमाणावर चालना मिळणार आहे. तसेच ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात सोलापूर ते मुंबई ही विमानसेवा सुरू केली जाणार असल्याची ग्वाही केंद्रीय विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिली.

विमानतळ प्राधिकरण परिसरात आयोजित सोलापूर ते गोवा विमान सेवा उद्घाटन समारंभ प्रसंगी केंद्रीय विमान वाहतूक राज्यमंत्री श्री. मोहोळ मार्गदर्शन करत होते. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, खासदार प्रणिती शिंदे, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, आमदार सर्वश्री विजयकुमार देशमुख, सुभाष देशमुख, समाधान आवताडे, सचिन कल्याणशेट्टी, रणजीतसिंह मोहिते पाटील, देवेंद्र कोठे, उत्तम जानकर, अभिजित पाटील, राजू खरे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पोलिस आयुक्त एम. राजकुमार, सोलापूर महापालिका आयुक्त सचिन ओंबासे, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम तसेच माजी खासदार जय सिद्धेश्वर शिवाचार्य स्वामी महाराज, माजी आमदार राजेंद्र राऊत, राम सातपुते, विमानतळ प्राधिकरण च संचालक चंद्रेश वंजारा, फ्लाय नाईन्टी वन कंपनीचे सीईओ दिनेश चाको, यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

केंद्रीय विमान वाहतूक राज्यमंत्री श्री. मोहोळ पुढे म्हणाले की सोलापूर हे दक्षिण पश्चिम भागाला जोडणारा केंद्रबिंदू आहे, त्याचबरोबर मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रासाठी महत्त्वपूर्ण ठिकाण असून येथून सुरू झालेली विमानसेवा ही सोलापूर सह या भागाच्या विकासातही महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल. कर्नाटक व तेलंगणाच्या सीमावर्ती भागातील जिल्ह्यांनाही याचा लाभ मिळेल असे त्यांनी सांगितले.

विमान कंपन्या एखाद्या शहरातून प्रवासी वाहतूक सुरू करण्यासाठी आर्थिकदृष्ट्या त्यांना लाभ मिळू शकेल का याचा विचार अगोदर करतात. त्यानंतरच विमानसेवा सुरू केली जाते आजपासून गोव्याला विमानसेवा सुरू झालेली आहेच, परंतु ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात मुंबईसाठी ही विमानसेवा सुरू करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अथक प्रयत्नातून गोव्यासाठी विमानसेवा सुरू झाली आहे, त्याप्रमाणेच मुंबईसाठी ही लवकरच ही सेवा सुरू केली जाणार असल्याची माहिती श्री. मोहोळ यांनी यावेळी दिली. तसेच सोलापूर विमानतळ येथून केंद्र शासनाच्या उड्डाण योजनेअंतर्गत तिरुपती हैदराबाद व बेंगलोर साठी ही विमानसेवा लवकरच सुरू केली जाणार आहे. तसेच या विमानतळावर वातावरण स्पष्टता बाबत तांत्रिक अडचणी उद्भवणार नाही यासाठी डीवॉल सिस्टीम बसवणे तसेच नाईट लँडिंग ची सुविधा उपलब्ध करणे या अनुषंगाने पुढील काळात काम केले जाणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी विमानसेवा शुभारंभाचा आजचा हा दिवस सोलापूर साठी आनंदाचा दिवस असल्याचे सांगून सोलापूरच्या उद्योग, व्यवसाय व पर्यटन वाढीसाठी महत्वपूर्ण आहे. पहिल्या टप्प्यात गोवा येथे सेवा सुरू होत असून गोवा येथून देश व विदेशात सर्व ठिकाणी विमानाने प्रवास करणे शक्य होणार असल्याचे त्यांनी सांगितले. लवकरच मुंबईची विमान सेवा सुरू करण्याची मागणी त्यांनी यावेळी केली. ही विमान सेवा सुरू करण्यासाठी सोलापूर जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पत्रकार व विकास मंच यांनी केलेल्या पाठपुराव्याचे पालकमंत्री यांनी कौतुक केले.

सोलापूर विमानतळ प्राधिकरणचे संचालक चंद्रेश वंजारा यांनी आपल्या प्रास्ताविकात सोलापूर विमान तळासाठी करण्यात आलेल्या विविध कामांची माहिती दिली. विकासासाठी हवाई संपर्क महत्त्वाचा असल्याचे सांगून ही विमानसेवा सुरू करण्यासाठी सर्वांचे प्रयत्न कामी आल्याचे त्यांनी सांगितले.

### झेंडा दाखवून विमान सेवेचा शुभारंभ

सोलापूर विमानतळ प्राधिकरणाच्या इमारतीमध्ये केंद्रीय विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ व पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. तसेच फ्लाय 91 कंपनीच्या विमानाला केंद्रीय वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ व पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी झेंडा दाखवून आजपासून सोलापूर ते गोवा या विमानसेवेचा शुभारंभ केला. यावेळी सर्व लोकप्रतिनिधी तसेच प्रशासकीय अधिकारी व अन्य मान्यवर उपस्थित होते. ही विमानसेवा आठवड्यातून चार दिवस असणार आहे. यावेळी मान्यवरांच्या हस्ते विमानतळ परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.



### पाच प्रवाशांना बोर्डिंग पास

आजच्या शुभारंभाच्या विमानामध्ये प्रवास करणाऱ्या सोलापूर येथील पाच प्रवाशांना केंद्रीय विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते, प्रातिनिधिक स्वरूपात बोर्डिंग पास देण्यात आले. यामध्ये चेतन लोढा, बाळकृष्ण दोड्डी, शिवाजी सुरवसे, प्रीती शिंदे व केतन शहा या विमान प्रवाशांचा समावेश आहे. तसेच फ्लाय 91 या विमान कंपनीच्या विमानातून गोवा येथून सोलापूर विमानतळावर आलेल्या प्रवाशांचे स्वागत पुष्पहार देऊन करण्यात आले.

## हीच ती वेळ, महाराष्ट्र हितासाठी..! ठाकरे बंधू एकत्र येणार?

### कार्यकर्त्यांमध्ये जोरदार चर्चा

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** गेल्या अनेक वर्षांपासून राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येतील, असं बोललं जात होतं. आता हे प्रत्यक्षात उतरेल असा विश्वास मनसैनिक आणि शिवसैनिकामध्ये दिसून येत आहे. मुलुंडच्या कालिदास नाट्यगृह येथे आदित्य ठाकरेंच्या कार्यक्रमा दरम्यान मुलुंड मध्ये 'ठाकरेबंधू मनोमिलन'चे लावण्यात आलेल्या बॅनरमुळे मुलुंडकरांमध्ये चर्चा रंगली आहे.

कालिदास नाट्यगृहात होणाऱ्या आदित्य ठाकरेंच्या कार्यक्रमाबाहेर लावलेले 'ठाकरे मनोमिलन'चे बॅनर चचेर्चा विषय ठरले आहेत. "वाट बघतोय महाराष्ट्र, साद घालतोय महाराष्ट्र.. ! हीच ती वेळ, महाराष्ट्र हितासाठी.. !" असे आशय असलेले मुलुंडमध्ये लावण्यात आलेले बॅनर प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत आहेत.



बॅनरवर धडकी ठाकरेंची, महाराष्ट्र सैनिक आणि शिवसैनिक, मुलुंड विधानसभा असा उल्लेख आहे. शिवसेनेच्या विभागलेल्या गटांमध्ये समेटाची शक्यता असल्याची चर्चा रंगू लागली आहे. राजकीय वर्तुळात याला 'युतीची नांदी' मानले जात आहे. राजकीय नेत्यांकडून यावर कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही. मात्र, हा प्रकार शिवसेनेतील संभाव्य एकत्रीकरणाच्या दिशेने महत्त्वाचं पाऊल असू शकतो, असा अंदाज वर्तवला जात आहे.

महापालिका निवडणुकीच्या तोंडावर पुन्हा हे दोन्ही भाऊ एकत्र येतील या चर्चांनी जोर धरला आहे. कारण, दुसरं तिसरं कोणी नाही, तर थेट राज आणि उद्धव या दोन्ही भावांनी तसे संकेत दिले आहेत. त्यामुळे हे दोन भाऊ एकत्र येतील का? यावर चर्चा करण्यापेक्षा दोघंही एकत्र आले तर नेमकं काय होऊ शकतं? आगामी मुंबई महापालिका निवडणुकीत राजकीय समीकरणं कसं बदलू शकतात? राजकारणावर त्याचे काय परिणाम होऊ शकतात? याची चर्चा सुरू आहे.

## आषाढीवारीपूर्वी पालखी मार्ग दुरुस्त करा; नागरिकांची मागणी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आषाढीवारी जवळ आल्याने पुणे सोलापूर महामार्गावरील खड्डे बुजविण्याचे काम तातडीने सुरू करावे अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. पुणे सोलापूर महामार्गावरून संत तुकाराम महाराज, संत चांगा वटेश्वर, चौरंगीनाथ महाराज आदी पालखी सोहळे पंढरपूरकडे जात असतात.

यंदा मे महिन्यात अवकाळी पाऊस मोठ्या प्रमाणात झाला. दौंड तालुक्यात वार्षिक सरासरी पावसाच्या ७५ टक्के पाऊस मे महिन्यात पडून गेला आहे. सततच्या पावसामुळे महामार्गावर अनेक ठिकाणी खड्डे पडले आहे. तर काही ठिकाणी डांबरीकरणावरचा थर पावसामुळे वाहून गेला आहे. त्यामुळे रस्ता खडबडीत झाला आहे. असा मार्ग अनवाणी वारी चालणारे व पालखी ओढणाऱ्या बैलांना जिकीरीचा ठरतो. याची दखल जिल्हा प्रशासनाने घ्यावी अशी मागणी होत आहे.



हडपसर ते पाटस या दरम्यान ६४ किलोमीटर महामार्गावरून पालखी सोहळा जाणार आहे. २२ जूनला संत तुकाराम महाराज यांचा पालखी सोहळा सोलापूर महामार्गावर येणार आहे. पुढील चार दिवस सोहळा महामार्गावर असणार आहे.

कासुर्डी टोलनाका ते कवडीपाट दरम्यानचा रस्ता हा रस्ते विकास महामंडळाकडे आहे. या रस्त्यावर टोल चालू असताना हा रस्ता सुस्थितीत होता मात्र आता त्याकडे शासनाचे दुर्लक्ष झाले आहे. तर कासुर्डी टोलनाका ते पाटस या दरम्यानचा रस्ता हा राष्ट्रीय महामार्ग प्राधीकरणाच्या अखत्यारीत येत आहे. त्यामुळे या दोन्ही विभागांनी ही रस्ता दुरूस्ती तातडीने हाती घ्यावी अशी मागणी होत आहे. अनेक ठिकाणी सेवा रस्त्याची दुरवस्था झाली आहे. ती सुद्धा तातडीने दुरूस्ती करण्याची मागणी आहे. महामार्गावर काही ठिकाणी काटेरी झाडांच्या फांद्या रस्त्यावर आल्या आहेत.

## महापालिका निवडणुका 3 टप्प्यात होणार, ऑक्टोबरमध्ये शंख वाजणार!

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची तयारी तीव्र झाली आहे. राजकीय पक्षांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी तयारी तीव्र केली आहे. दुसरीकडे, राज्य निवडणूक आयोग ऑक्टोबर महिन्यात निवडणूक वेळापत्रक जाहीर करू शकते आणि तीन टप्प्यात निवडणुका होतील.



पहिल्या टप्प्यात उत्तर आणि दक्षिण महाराष्ट्रात मतदान होईल. दुसऱ्या टप्प्यात विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यात मतदानाचे नियोजन केले जात आहे आणि तिसऱ्या टप्प्यात मुंबई, ठाणे आणि कोकणात मतदान होईल. निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांच्या मते, प्रशासकीय आणि राजकीय नियोजनानुसार, 3 टप्प्यात निवडणुका घेण्याचे नियोजन केले जात आहे. राज्यातील 29 महानगरपालिका, 257 नगरपालिका, 26 जिल्हा परिषदा आणि 288 पंचायत समित्यांसाठी ऑक्टोबर महिन्यात या निवडणुका होऊ शकतात.

निवडणूक आयुक्त वाघमारे यांच्या मते, 2011 च्या जनगणनेनुसार प्रभागांची रचना केली जाईल. काही ठिकाणी प्रभागांच्या रचनेत आणि सीमांमध्ये बदल होतील. काही लोक याविरुद्ध न्यायालयात जाऊ शकतात. त्यामुळे प्रभाग तयार करण्यासाठी दोन महिने लागतील. संपूर्ण निवडणूक प्रक्रिया अंतिम करण्यासाठी तीन ते साडेतीन महिने लागू शकतात. त्यामुळे ऑक्टोबर महिन्यात निवडणुका होऊ शकतात.





पत्ता :- वृंदावन पार्क, होटगी रोड सोलापूर, फोन : ०२१७-२६०५०९१, ०२१७३५५०५९२, मो. ९६५७०६९०६९, मो.९७६५३९०३३९

## आपणही होवू शकता "मुक्त पत्रकार"

नमस्कार....,

आपणही "मुक्त पत्रकार" होवून समाजात मानसन्मान व प्रामाणिकपणे काम करुन प्रामणिक पैसे कमवू शकता. शेतकरी, व्यवसायिक, निमशासकीय कर्मचारी, सुशिक्षित बेरोजगार, डॉक्टर, वकील, इंजिनियर, विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, मुख्याध्यापक, प्राचार्य, ग्रंथपाल, आजी माजी संरपंच, ग्रामपंचायत सदस्य, नगरसेवक यासह समाजाचे हित जोपासणारा कोणताही सुजाण नागरिक "मुक्त पत्रकार" होवू शकतो.

या संधीचा लाभ घेण्यासाठी आपण १०००/- रूपये भरून वार्षिक वर्गणीदार (सभासद) होणे आवश्यक आहे. वार्षिक वर्गणी भरणाऱ्यास १०००/- रूपये किंमतीची पुस्तके भेट देऊन वर्षभर अंक घरपोच पाठविला जाणार आहे. तसेच आपली किंवा आपण द्याल ती (२ कॉलम ५ सेंमी) इतकी जाहिरात वर्षातून एकदाच दैनिक "कटूसत्य" या वृत्तपत्रात अगदी मोफत प्रसिद्ध केली जाईल.

मग चला तर ९६५७०६९०६९ या मोबाईल क्रमांकावर 'फोन पे', 'गूगल पे' करून, दैनिक सोलापूर कटूसत्य या नावानी चेक/डी.डी.किंवा Daily Solapur Katusatya, Lokmangal Co-Op Bank LTD., Solapur, AC:- 0020011120001265, IFSC:- IBKL0478LOK या खात्यावर आपली रक्कम ऑनलाईनद्वारे जमा करून वर्गणीदार व्हा. आणि "मुक्त पत्रकार" होण्याची नामी संधी मिळवा. आपण रक्कम जमा केल्यानंतर तात्काळ ९६५७०६९०६९ या मोबाईल क्रमांकावर कळवा. आणि रक्कम पाठविल्याचा स्क्रीनशॉट, पावती, आपल्या संपूर्ण माहितीसह अर्ज, फोटो, शैक्षणिक पात्रता, भारतीय असल्याचा पुरावा आणि subject मध्ये 'मुक्त पत्रकार' असे लिहून katusatyajob@gmail.com या मेलवर पाठवा. म्हणजे या योजनेच्या सर्व सुविधा आपणास देणे आम्हांला सोपे होईल.

**नियम व अटी:-** १) आपण आपली संपूर्ण माहिती पाठविल्यानंतर दोन दिवसात आपल्या मोबाईलवर डिजिटल मध्ये "मुक्त पत्रकार" म्हणून ओळखपत्र पाठविले जाईल. २) "मुक्त पत्रकार" मुळ ओळखपत्र व पुस्तके पाठविण्याचा पोस्टल व इतर खर्च २००/- रूपये आपणास द्यावे लागतील. (कार्यालयात येवून हे सर्व साहित्य घेऊन गेल्यास पोस्टल खर्च घेतला जाणार नाही.) ३) सहा महिन्या नंतर "मुक्त पत्रकार" म्हणून 'प्रमाणपत्र' दिले जाईल. ४) आपण सर्व प्रकारच्या बातम्या पाठवू शकता. मात्र बातमी लावण्याचे व मानधन देण्याचे सर्व अधिकार दैनिक 'कटूसत्य' व 'वृत्तदर्पण' न्यूज चॅनल कडे राखीव ठेवले जातील. ५) महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही गावातील, शहरातील किंवा महानगरातील व्यक्ती "मुक्त पत्रकार" म्हणून काम करू शकतो. ६) आपल्या वृत्तपत्र व न्यूज चॅनलच्या विविध योजणेंसाठी जाहीराती संकलन केल्या जातात. आपण स्वतः संकलन केलेल्या जाहीरतीच्या (जमा केलेल्या) रक्कमेवरच आपल्याला कमिशन दिले जाईल. ७) या योजनेत सहभागी होवून कमिशनच्या स्वरूपात पैसे कमावण्याची संधी आहे. ८) आमचे "मुक्त पत्रकार" झाल्यानंतरच आपल्या जाहीराती स्वीकारल्या जातील व आपण पाठविलेल्या जाहिरातीवरच २०% ते ४०% कमिशन दिले जाईल. ९) कोणत्याही जाहिरातची संपूर्ण रक्कम जमा केल्याशिवाय जाहिरात प्रसिद्ध किंवा प्रसारीत केली जाणार नाही. १०) सदर योजनेचे नियम बदलणे किंवा रद्द करणे या बाबतचे सर्व अधिकार दैनिक कटूसत्य व वृत्तदर्पण न्यूज चॅनल कडे राखीव ठेवले आहेत. ११) मग...! चला तर, आजच "मुक्त पत्रकार" होवूया..!! आणि कमिशनच्या स्वरूपातून पैसे कमविण्यास सुरूवात करुया...!!!

जे जे चांगले ते ते अंगिकारुया
करी होऊन पणती ! एक सुर्य निर्मूया
अंधार पळवूनी बेकारीचे ! नवे आव्हान पेलूया
हाताला काम, कामाला दाम - चला गाळूया घाम

आपला विश्वासू
सपादक दै.सा.कटूसत्य

टिपः- "कटूसत्य" व "वृत्तदर्पण" या समुहात आपले स्वागत. आपण आणखीन काहीजणांना आपल्या समुहात सामील कराल अशी अपेक्षा.


## सोलापूरात भाजपच्या एकोप्याला तडा

## पक्षामधील नेत्यांमध्ये वाढतोय दुरावा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** भारतीय जीवनमूल्ये हाच आमचा आधार.. ही बौद्धिके देत कार्यकर्ते तयार करणारा पक्ष ही भाजपची ओळख. याच पठडीतून सोलापुरातही अनेक नेते तीन ते चार दशकांपासून काम करत आहेत. मात्र, प्रदेश नेतृत्वाच्या दुर्लक्षामुळे भाजपच्या एकोप्याला तडा जात आहे.

पण, काही वर्षांत भिन्न विचारांच्या नेत्यांची आयात झाली. ही मंडळी सोबत त्यांचे संस्कारही घेऊन आले. आता त्यांना मोठी पदेही बहाल केली गेली. अशा वेळी पक्षातील अनुभवी नेत्यांचा आदर, सन्मान ठेवत वाटचाल करणे अपेक्षित होते. आयात नेत्यांवर हे संस्कार करण्याची व्यवस्था गरजेची होती. पण प्रदेश येथे कमी पडला. यातूनच भाजपतील एकोप्याला तडा गेला. प्रदेशाध्यक्ष येऊनही हा दुरावा दूर झाला नाही.

सोलापुरात काँग्रेसचा दरारा होता तेव्हा दोन दशकांपूर्वी शहर उत्तरमध्ये कमळ फुलले. भाजपसाठी वाळवंट असलेल्या दक्षिण तालुक्यात २०१४ मध्ये भाजप यशस्वी झाला. त्यानंतर जिल्ह्यात पक्षाची फळी भक्कम करण्यात आली. सत्ता आल्यानंतर पक्षाने त्यांच्या पदरात मंत्रिपदे टाकली. इथपर्यंत ठीक होते. पण २०१९ नंतर हळूहळू सर्वच बदलत गेले. राज्यातील राजकारणात वेगाने बदल घडले. भाजपने बेरजेचे राजकारण केले. इतर पक्षातील नेत्यांची आयात करण्यावर भर दिला. इतर पक्षातून आलेल्या नेत्यांची कार्यशैली भाजपत येऊनही बदलली नाही. जुन्या नेत्यांना हे रुचणारे नव्हतेच. यातूनच स्थानिक स्तरावर भाजपविरुद्ध भाजप अशी दुफळी निर्माण झाली. नवा - जुना वादही सुरू झाला. हे कमी म्हणून की काय लोकसभा निवडणुकीत पक्षविरोधी काम केलेल्या अनेकांना पक्षात पदे दिली गेली. स्वाभाविकच पक्षाचे निष्ठावंत नेते, कार्यकर्ते दुखावले गेले.

### पक्षाशी नाळ असलेल्यांना बुरे दिन

जुन्या नेत्यांच्या कार्यशैलीत त्रुटी नाहीत असे नाही. पण वर्षानुवर्षे काम केल्यातून पक्षाशी एक नाळ तयार झाली आहे. कठीण काळात पक्षाचे काम करत राहिलेल्या नेत्यांना बुरे दिन आणि केवळ सत्ता, पैसा, टक्केवारी आदीच्या आमिषाने पक्षात आलेल्या, राहिलेल्यांना अच्छे दिन आल्याचे प्रखरतेने जाणवू लागले आहे. सोलापुरात भाजपचे प्रतिनिधित्व करणारे जुने नेते असो की नवीन, त्यांना पक्षीय एकसंधतेचा धडा देण्यात प्रदेश स्तरावरील यंत्रणाच कमी पडत आहे.

### विसंवादाचा परिणाम शहर विकासावर

पालकमंत्र्यासोबत पक्षातील पदाधिकाऱ्यांऐवजी नवख्या नेत्यांचा गराडा असतो. मक्तेदारांची रेलचेल असते. जुने, जाणकार नेते अनेक बैठकांपासून चार हात लांब राहणे पसंत करीत आहेत. याचा परिणाम शहर विकासावर होत आहे. शहर जिल्ह्यातील भाजपात एकोपा तयार झाल्यास त्याचे प्रतिबिंब विकास कामातून उमटू शकणार आहे. अन्यथा आगामी महापालिकेत भाजपची सत्ता आली तरी पक्षातील रस्सीखेच विकास कामांवर भारी पडेल, यात शंका नाही.




## संपादकीय

# संशयकल्लोळ

लोकसभेतील विरोधी पक्ष नेते आणि काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी पुन्हा एकदा एका लेखाच्या माध्यमातून देशातील निवडणूक यंत्रणेबाबत संशय व्यक्त केला आहे. या संशयाला उत्तर देताना निवडणूक आयोगाने आणि सरकारी यंत्रणांनीसुद्धा नेहमीच्याच पद्धतीने स्पष्टीकरण दिले आहे. राहुल गांधी यांनी आपल्या पूर्वीच्याच आरोपांची पुन्हा एकदा नव्याने मांडणी केली आहे आणि निवडणूक आयोगानेसुद्धा पूर्वीच्याच पद्धतीने नव्या आरोपांना उत्तर दिले आहे. साहजिकच देशातील निवडणूक यंत्रणेबाबत संशय निर्माण करणारा हा खेळ आणखी किती काळ चालू राहणार याबाबत विचार करावा लागेल. देशात लवकरच बिहार आणि इतर काही राज्यांमध्ये विधानसभांच्या निवडणुका होणार आहेत. या पार्श्वभूमीवर राहुल गांधी यांनी पुन्हा एकदा हा विषय उपस्थित केला असला, तरी यापूर्वी निवडणूक आयोगाने काँग्रेसला अधिकृतपणे या प्रश्नांची उत्तरे पाठवली आहेत. आता राहुल गांधी यांच्या नवीन आरोपाप्रमाणे निवडणूक म्हणजे मॅच फिक्सिंगचा खेळ झाला आहे, विशेषतः महाराष्ट्रातील निवडणूक ही मॅच फिक्सिंग होती असेही त्यांनी म्हटले आहे. ज्या राज्यांमध्ये भाजपला पराभवाचा धोका वाटतो, त्या ठिकाणी अशा प्रकारे निवडणूक आयोगाच्या माध्यमातून मॅच फिक्सिंगचा खेळ केला जातो असे त्यांना म्हणायचे आहे. पण वास्तव विचार करायचा झाला तर तेलंगणा आणि कर्नाटक या राज्यांमध्येसुद्धा भाजपाला पराभवाची भीती होती.पण तेथे पुन्हा एकदा काँग्रेसची सरकारे सत्तेवर आली आहेत.

निवडणूक यंत्रणांचा वापर करूनच निवडणूक जिंकायची असेल तर कोणत्याही निवडणुकीत 100 टक्के यश मिळवणे अशक्य नाही. अर्थात विरोधी पक्षांच्या युक्तिवादाप्रमाणे शंभर टक्के यश मिळाले तर जास्त संशय निर्माण होऊ शकतो म्हणूनच काही जागा विरोधी पक्षांना जिंकू दिल्या जातात. यावर निवडणूक आयोगाने वेगळ्या प्रकारे उत्तर दिले आहे. निवडणुकीत प्रतिकूल निकाल लागला की निवडणूक आयोगावर अशा प्रकारचे आरोप करण्याची सवय अनेकांना लागली आहे अशा आशयाचा आरोपवजा खुलासा निवडणूक आयोगाने केला आहे. निवडणुकीमध्ये शेवटच्या दोन तासांमध्ये संशयास्पदरित्या जास्त मतदान झाल्याचा जो आरोप केला जातो त्यालाही निवडणूक आयोगाने उत्तर दिले आहे.

राहुल गांधी यांनी निवडणूक यंत्रणेबाबत आरोप करणे आणि निवडणूक आयोगाने किंवा सत्ताधार्यांनी त्याला उत्तरे देणे हा खेळ आता दीर्घकाळ खेळला जात आहे. पण हा खेळ थांबणार तरी कधी याचे उत्तर मात्र कोणाकडेही नाही. विरोधी पक्षांच्या मागणीप्रमाणे जरी मतपत्रिकांच्या माध्यमातून निवडणूक घेण्याचा प्रयोग झाला तरी तो संपूर्णपणे सुरक्षित असेल याची कोणतीही हमी देता येत नाही. कारण ज्या बिहार राज्यामध्ये लवकरच विधानसभा निवडणूक होणार आहे त्याच राज्यामध्ये काही वर्षापूर्वी मतपत्रिकांच्या माध्यमातून निवडणुका होत असताना मतपत्रिका पळवणे, बूथ ताब्यात घेणे आणि हिंसाचार करणे अशा अनेक गोष्टी घडत असत. आता ईव्हीएममुळे झालेल्या संशय कल्लोळाला जर पूर्णविराम द्यायचा असेल तर राहुल गांधी यांनी जे काही प्रश्न उपस्थित केले आहेत आणि ज्या मागण्या केल्या आहेत त्याची पूर्तता निवडणूक आयोगाने करायला हवी.

राहुल गांधी यांनी आपल्या लेखात म्हटल्याप्रमाणे, निवडणूक आयोगाने सर्व राज्यातील विशेषतः महाराष्ट्रासह नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा आणि विधानसभाच्या निवडणुकींसाठी एकत्रित डिजिटल आणि मशीन रिडेबल मतदार यादी प्रकाशित करावी, तसेच महाराष्ट्रातील मतदान केंद्रांमधील सायंकाळी पाच नंतरचे सर्व सीसीटीव्ही फुटेज सार्वजनिक करावे अशी मागणी केली आहे. राहुल गांधी यांची ही मागणी पूर्ण करून जर या संशय कल्लोळाला पूर्णविराम मिळणार असेल तर निवडणूक आयोगाने या मागणीचा विचार करायला काहीच हरकत नाही. महत्त्वाची गोष्ट म्हणजे निवडणूक आयोगाने जर कदाचित ही मागणी पूर्ण केली आणि त्यात काहीच तथ्य आढळले नाही तर राहुल गांधी यांच्या काँग्रेस पक्षासह सर्वच विरोधी पक्षांना आपल्याला निवडणुकीमध्ये का यश मिळत नाही याचा विचार वेगळ्या पद्धतीने करावा लागणार आहे. भाजप केवळ निवडणूक यंत्रणेचा वापर करून आणि गैरवापर करून सत्तेवर येतो असा आरोप करतानाच मतदारांचाही एक प्रकारे अपमान केला जात आहे हेसुद्धा लक्षात घ्यावे लागेल. महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीमध्ये लाडकी बहीण योजना आणि मतदारांचे ध्रुवीकरण या दोन गोष्टींचा परिणाम मोठ्या प्रमाणात झाला होता हे निवडणूक विश्लेषकांचेही मत आहे. दुसरीकडे लोकसभा निवडणुकीमध्ये अबकी बार 400 पारची घोषणा करणाऱ्या नरेंद्र मोदी यांच्या भाजपला 240 जागांवर समाधान मानावे लागले होते ही बाबसुद्धा विसरून चालणार नाही.

जर ईव्हीएम किंवा निवडणूक यंत्रणा हाताशी धरून यश मिळवणे शक्य असते तर नरेंद्र मोदी सरकारला 400 पार करणेसुद्धा काही अवघड नव्हते आणि काही पक्षांच्या कुबड्या घेण्याची गरज नव्हती. ही वास्तव परिस्थितीसुद्धा राहुल गांधी यांना लक्षात घ्यावी लागेल. जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून गौरव होत असलेल्या भारतामध्ये निवडणूक यंत्रणेबाबत सातत्याने असा संशय निर्माण करणे कितपत योग्य आहे हेसुद्धा लक्षात घ्यावे लागणार आहे. म्हणूनच निवडणूक आयोगाने एकदाच सर्व माहिती सार्वजनिक करून त्यांच्या कार्यशैलीबाबत निर्माण झालेल्या या संशयाला पूर्णविराम द्यायला हवा. प्रत्येक निवडणुकीनंतर किंवा प्रत्येक निवडणुकीपूर्वी अशा प्रकारे निवडणूक यंत्रणेबाबत संशय निर्माण होणे आपल्या लोकशाहीला परवडणारे नाही.

## प्रबोधन

# 'कार्यमग्न राहा'। सांगतो निसर्ग

शरीर हा जगण्याचा खरा आधार की मन? मन मारून जगातली बहुसंख्य दुर्दैवी माणसं जिवंत राहू शकतात, ही वस्तुस्थिती आहे. पण निर्जीव शरीरात मन असतं असं कुणी म्हणेल काय? शरीर चैतन्यहीन झाल्यावर जीवनाचा विचार पूर्णविराम पावतो. सजीव शरीराचं महत्त्व सांगताना स्वामी विवेकानंद म्हणतात, 'ईश्वराची उपासना करण्यासाठी एखादी प्रतिमा तुम्ही खुशाल निर्माण करा. पण तिच्याहीपेक्षा कितीतरी अधिक चांगली प्रतिमा आधीचीच अस्तित्वात आहे. आणि ती श्रेष्ठ प्रतिमा म्हणजे मनुष्य, जिवंत माणूस!' प्राचार्य शिवाजीराव भोसलेसुद्धा म्हणतात, 'जीवनातून शरीर वगळलं तर मागे उरेल ते शून्य! बुद्धी, मन (आत्मा) हे घटक विनाश पावून हवेत विरून जातील! मरणोत्तर जीवनाच्या विचाराला सुबुद्ध लोक मानत नाहीत, हेच खरं!' स्वामीजीही म्हणतात, मनुष्यदेह हेच भगवंताचे श्रेष्ठ मंदिर आहे! पण समाजातील सर्व लोक, निदान स्वतःला अध्यात्मवादी, सुसंस्कृत म्हणवणारी माणसं तरी तशा बुद्धीने विचार करतात का ? वागतात का ? थोर शास्त्रज्ञ डार्विन यांच्या उत्क्रांतीवादी सिद्धान्तानुसार, एकपेशीय प्राण्यांचा विकास होत होत शेवटी माणूस जन्मला, हे आता सुशिक्षितांना तर सांगावं लागत नाही. फक्त कट्टर धार्मिक, मूर्ख आध्यात्मिक, अक्षरशत्रू भाविकच तेवढे माणसाला परमेश्वर जन्माला घालतो असं बरळत असतात. मुलं देव देतो असं म्हणणाऱ्यांची गाडगेबाबा चेष्टा करीत आणि नवसे कन्यापुत्र होती। तरी का करावा लागे पती ॥ असा खवचट प्रश्न विचारीत.

मनुष्य निसर्गनिर्मित आहे, पण तो निसर्गनियमांना अनभिज्ञ होत आहे. प्राणी निरोगी जीवन जगतात, पण माणसं चुकूनच निरोगी भेटतात. प्राण्यांची इंद्रियं त्यांच्या जीवनांपर्यंत कार्यक्षम असतात. पण आपली इंद्रियं कार्यक्षम ठेवणं माणसांना दुरापास्त होतं. बहुसंख्य प्राणी आपलं पूर्ण आयुष्य जगतात. पण अनेक माणसं बिचारी अर्ध आयुष्यही जगत नाहीत. प्राणी आणि मानव यांची तुलना करताना प्राचार्य भोसले म्हणतात, 'पशूपक्ष्यांना उपजत बुद्धी असते. तिचा वापर करून ते सुखाने जगतात. जनावरांना व्यसन नसतं. माणसं याबाबतीत जनावरांना मागे टाकतात. माणसाला मन या नावाचा ऐवज जपता आलेला नाही. शुद्ध पशुत्व कोठेही पाहावयास मिळेल. पण शुद्ध मानव्य मात्र शोधावं लागेल.' एकूण मानवी जीवनाची खालावलेली प्रत पाहिल्यावर प्राणीजीवनाला दोन गुण अधिक मिळतील.

जगात शुद्ध मानव्य का दुर्मीळ आहे? निसर्गाने माणसाला बुद्धीचं वरदान देऊनही तो माणुसकीला का पारखा होत आहे? मग निसर्गाने माणसाला दिलेली बुद्धी हा शाप की वरदान आहे? जगातील काही थोर पुरुषांना विश्वाने वंदन करावं, अशी बुद्धी निसगार्नेच दिली आहे आणि माणुसकीला काळिमा फासणारी विनाशकारी बुद्धीही निसर्गानेच काही नरराक्षसांना दिली आहे. निसर्गाच्या देणग्या पशूंना जशाच्या तशा स्वीकाराव्या लागतात. पण मनुष्य निसर्गशक्तीच्या देणगीला विधायक वळण लावू शकतो. आजचा मनुष्य निसगार्चे मंत्र न म्हणता तंत्र समजून घेऊन पुढे पुढे चालला आहे. म्हणूनच तो जगाला भेडसावणाऱ्या समस्यांवर नक्की मात करू शकेल. माणुसकीची जपणूक आणि जोपासना करण्यासाठी चाललेले माणसाचे शिस्तबद्ध प्रयत्न साकार होत आहेत. क्रौर्य आणि हिंसा ह्या मनुष्याच्या आदिम प्रेरणांचा आज सर्वत्र निषेध केला जात आहे. अहिंसा, दया, क्षमा, शांती सहिष्णुता यांची किंमत माणसांना कळून येत आहे. कर्ता-करविता असं परमेश्वराविषयी न म्हणता स्वतःची कर्तृत्वशक्ती माणसं पणाला लावीत आहेत. तमोयुगातून मानवजात तेजोयुगाकडे चालली आहे, मानव्य आता नक्की सापडेल. म्हणून लक्षात ठेवा–

जग हे स्वयंभू । निसर्ग हा प्रभू
ईश्वर न प्रभू । सृष्टीकर्ता ॥ १
'कर्ता-करविता' । शब्द जुना झाला
निसर्गाच्या लीला। ध्यानी घेता ॥२
निसगार्ने दिले। हवा, पाणी, अन्न
देवाजी तो कोण । यात सांगा? ॥ ३
प्राणी, पक्षी आणि मानवी उत्पत्ती
निसर्गाच्या हाती। जादू सारी ॥४
मानवाला शक्ती । बुद्धी त्याने दिली
मग प्रगतीला । बाधा कोठे ? ॥५
'कार्यमग्न राहा'। सांगतो निसर्ग
याच जगी स्वर्ग । उतराया ॥६



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

## प्रबोधन

# शर्यतीचा नादी । नसावा पालक

दहावी-बारावीचे निकाल जाहीर झाले की, सर्वोत्कृष्ट यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचं मनोगत आणि त्यांची महत्त्वाकांक्षा समजून घेण्याचं काम माध्यमं निष्ठापूर्वक करतात. मुलाखत देणारी मुलं आपले भावी बेत पढवलेल्या पोपटासारखे बोलतात. या मुलांचं ते स्वतःचं मनोगत असतं की, त्यांच्या पालकांनी त्यांना पढवलेलं असतं, हे समजून घेण्याची सवड अशा घाईगर्दीत कोणालाच नसते. आणि इथूनच कुशाग्र बुद्धीच्या मुलांच्या गुणवत्तेला एक विघातक वळण लागतं. या मुलांनी स्वतः काय व्हायचं, हे खरं तर खूप महत्त्वाचं असतं. पण आपल्या शिक्षणव्यवस्थेत बौद्धिक उत्तुंगपणाला गुणवत्ता (Merit) म्हटलं जातं. या गुणवत्तेचा वास्तविक व्यक्तिमत्त्वातील स्वभाव, कल, आवड, अभिरुची, संस्कार आणि मूल्यप्रेमाशी, किंवा प्रबळ सद्गुणाशी काही संबंध असू नये, हे खरं तर फार मोठं संकट आहे.

हे संकट एकाएकी कोसळत नाही. अगदी प्राथमिक शिक्षणापासूनच पालक आपल्या मुलाने काय व्हावं, हे ठरवू लागतात. या पालकांना बदलत्या परिस्थितीची फारशी जाणीव नसते. आपली भंगलेली स्वप्नं जुळवून तीच आपल्या पाल्याच्या भविष्यकाळाशी ते जोडत असतात. काळ बदललेला आहे, हेसुद्धा त्यांना माहीत नसतं. समाजाच्या गरजा बदललेल्या आहेत, हेसुद्धा त्यांना कळत नाही. प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ डॉ.झाकीर हुसेन म्हणाले होते, 'व्यक्तीचा सर्वांगीण विकास करण्याच्या दृष्टीने साचेबद्ध शिक्षण देण्याचा प्रयत्न करणं, हे सर्वस्वी अयोग्य आहे. भौतिक समृद्धीचा आग्रह पालकांनी नव्या पिढीच्या मनावर फार मोठ्या प्रमाणात बिंबवला आहे. गेल्या तीस-चाळीस वर्षांत भौतिक समृद्धीच्या मागे लागून शासकीय सेवेतील बड्या अधिकाऱ्यांनी जो प्रचंड भ्रष्टाचार केला आहे, तो आमदार, खासदार आणि मंत्र्यांनासुद्धा मागे टाकणारा आहे. त्यांच्या संस्कृतीहीन भ्रष्ट प्रवृत्तींची मुळं त्यांच्या पालकांच्या चंगळप्रेमी मनोवृत्तीतच शोधली पाहिजेत.

केंद्रीय प्रवेश चाचण्यांमध्ये (CET) लाखो विद्यार्थ्यांनी जरी भाग घेतला, तरी काही हजारच त्यामध्ये यशस्वी होतात. याचा अर्थ, लाखो विद्यार्थी सुमार, गचाळ, टाकाऊ, बिनकामाचे आहेत, असा केला जाणं, हे राष्ट्रनिर्मितीच्या दृष्टीने अत्यंत घातक आहे. या विद्यार्थ्यांचे पालक दैववादी तरी होतात किंवा हतोत्साह होऊन निष्क्रिय तरी होतात. या पालकांनी रद्दी कागद आणि टाकाऊ कचऱ्यातून काही टिकाऊ वस्तू करणाऱ्या कष्टाळू व्यक्तींकडे पाहावं. गुणवंत विद्यार्थ्यांना नोकरी सहज मिळते, पण त्यांच्यात जीवनात हरघडी उभ्या ठाकणाऱ्या आव्हानांशी यशस्वीपणे झुंजण्याची क्षमता असतेच, असं नाही. ही गोष्ट लक्षात घेऊन आपल्या पाल्यांची त्या दृष्टीने तयारी करणारे पालक हेच आदर्श पालक होत. समाज उभारणीत त्यांचा सहभाग निश्चितपणे कौतुकास्पद आहे. डॉ.हिबन म्हणतात, 'प्राप्त परिस्थितीशी संघर्ष करण्याच्या योग्यतेलाच शिक्षण असं म्हटलं पाहिजे.'

विद्यार्थीकेंद्रित शिक्षणपद्धतीचा पाया घालणारे थोर शिक्षणतज्ज्ञ हर्बार्ट स्पेन्सर यांनी म्हटलं आहे, 'शिक्षणाचं महान उदिष्ट ज्ञान नाही, कर्म आहे!' लोकमान्य टिळकांनीसुद्धा भक्तियोग, ज्ञानयोगापेक्षा कर्मयोगाचं श्रेष्ठत्व आपल्या गीतारहस्य ग्रंथातून स्पष्ट केलंय. भावी पिढीला कर्मयोगाचा संस्कार सामान्य पालकसुद्धा आपल्या आचरणाने देऊ शकतो. आपल्या मुलांच्या नैतिकतेचा आलेख उर्ध्वगामी करणारे पालक हे सामान्य असतील; पण त्यांचं कार्य फार मोठं आहे. पूज्य सानेगुरुजींच्या गरीब परिस्थितीतील आईने हेच काम निष्ठापूर्वक करून एक थोर समाजसेवक देशाला दिला. इमर्सन हे विचारवंत म्हणतात, 'कृतीत उतरलं नाही, तर सद्विचारांचं मूल्य सुखस्वप्नापेक्षा अधिक नाही.' आजचा पालक हा विद्यार्थ्यांच्या मेंदूत अनेक प्रकारचं ज्ञान ठासून-ठेचून भरण्यामागे वेडा झालेला आहे. आज जग ज्ञानविस्फोटाने त्रस्त झालेलं आहेच; त्यात पुन्हा पालकांचं दिशाहीन हावरट वर्तन भरीला पडत असल्यामुळे मुलांचे हाल हाल केले जात आहेत. एका विचारवंताने ह्या परिस्थितीची समीक्षा करताना फारच मार्मिक विचार आपणापुढे ठेवला आहे. ते म्हणतात, 'शिक्षण आणि निव्वळ माहिती ही एकच मानली, तर ग्रंथालयांना थोर महात्मे आणि ज्ञानकोषांना ऋषी म्हणावे लागेल.' सुज्ञांना अधिक सांगणे नको! तेव्हा लक्षात ठेवा–

शिक्षण सांभाळा । मूलही सांभाळा
दोन्हीही सांभाळा। पालक हो ॥१
जग जिंकण्याची इच्छा आहे छान
वाढून मरण। पुढे येते ॥२
शर्यतीचा नादी । नसावा पालक
दौडते बालक । उरी फुटे ॥ ३
आपली अपुरी । स्वप्ने का लादता?
जीव का हो घेता । भविष्याचा ॥४
वाढू देत मूल । स्वतःच्या कलाने
वळण कष्टाने । त्याला द्यावे ॥५
थोर नीतिमंत । बालक होऊ दे
देशा उद्धारू दे । मनोयोगे ॥ ६
नवी पिढी व्हावी । महाकर्मयोगी
नसे या सारखी । प्राप्ती अन्य ॥७
मानवाचे हित । साधे ते शिक्षण
ठेवी लोकभान । तीच विद्या ॥८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# प्रत्येकात असतो एक नेता!

# 'प्रत्येक व्यक्ती हा नेता असतो'

माझे हे वाक्य काही जणांना अतिशयोक्ती वाटेल. परंतु नेता म्हणजे फक्त राजकीय पुढारी नव्हे. प्रत्येक व्यक्ती त्याच्या पातळीवर नेतृत्व करत असतो.खेळाच्या संघाचा 'कर्णधार' हा त्या संघाचा नेता असतो. लष्करात सैन्याच्या तुकडीचा प्रमुख हा त्या सैन्याचा नेता असतो. वर्गामध्ये शिक्षक हा विद्यार्थ्यांचा नेता असतो. मुख्याध्यापक शाळेतील सर्व शिक्षकांचा नेता असतो. एखाद्या कंपनीतील मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) हा त्या कंपनीतील सर्व कर्मचाऱ्यांचा नेता असतो. इतकेच नव्हे तर कुटुंबप्रमुख हा त्या कुटुंबाचा नेता असतो.प्रत्येकाला आयुष्यात नेतृत्व करण्याची संधी मिळते. नेतृत्व करणे हे जबाबदारीचे काम असते, कारण नेत्याच्या चुकीमुळे त्याच्या अधीन असणाऱ्या सर्व घटकांना त्याचे परिणाम भोगावे लागतात.

**मग, नेता कसा असावा?**

या विषयावर अनेक विद्वान, तत्त्ववेत्ते, संत-महात्म्यांनी आपले विचार मांडले आहेत. त्यांचा सारांश असा करता येईल की, निःस्वार्थीपणा, दूरदृष्टी, ऐकण्याची वृत्ती, जबाबदारी, प्रेरणादायी स्वभाव, न्यायनिष्ठा, कणखरपणा आणि उदारमतवाद हे गुण नेत्यामध्ये असावेत. असे गुण असलेला नेता स्वतःसह इतरांनाही पुढे घेऊन जातो.

**नेता तयार होतो कसा?**

नेतृत्व मिळवण्याचे चार मार्ग आहेतः

१) कठीण काळात इतरांना सावरणारा व्यक्ती नेता बनतो.

२) विशेष गुण आणि क्षमता असलेल्या व्यक्तीला नेतृत्व बहाल केले जाते.

३) विशिष्ट कामात पारंगत असलेल्या व्यक्तीला त्या कामासाठी नेतेपद दिले जाते.

४) सकारात्मक दृष्टिकोन असलेल्या व्यक्तीला नेतृत्व दिले जाते.

**नेतृत्वाची गरज का?**

ज्याप्रमाणे जहाजाचा कॅप्टन ते जहाज वादळांमधून पार नेतो, त्याचप्रमाणे समूहासाठी नेता आवश्यक असतो. जहाज भरकटल्यास त्याची जबाबदारी कॅप्टनवर येते, तशीच समूह भरकटल्यास त्याची जबाबदारी नेत्यावर असते. अँथनीटी दादवानो याने म्हटले आहे, 'चांगले नेतृत्व फक्त चांगल्या गोष्टी करत नाही, तर त्या अधिक चांगल्या प्रकारे कशा करता येतील, हे शोधते.' विन्स लोंबार्डी म्हणतात, 'नेतृत्व हे जन्मतः मिळत नाही, ते घडवावे लागते.'

मी माझ्यात नेतृत्व गुण कसे आणू?

१) आदर्श कृती करा. फक्त तोंडी उपदेश करणारा नेता बनत नाही. महान नेता तोच असतो जो स्वतः कृती करतो आणि लोक त्याचे अनुकरण करतात.

२) ध्येय निश्चित ठेवा. नेत्याचे ध्येय स्पष्ट असावे आणि त्या दिशेने कृती ठरवलेली असावी.

३) निर्णयक्षमता विकसित करा. महान नेता स्वतःचे निर्णय स्वतः घेतो.

४) भीतीवर मात करा. अपयशाची, टीकेची, जोखमीची किंवा संवादाची भीती बाळगू नका. 'ज्याची भीती वाटते ते काम पहिल्यांदा करा,' असे म्हणतात.

५) प्रेरणादायी बना. आपल्या समूहाचे जीवनमान सुधारण्यासाठी धडपडा. त्यांच्याशी संवाद साधा, त्यांच्या ताकदी व मयार्दा ओळखा आणि त्यांच्या विकासासाठी काम करा.

"महान नेता इतर नेत्यांची निर्मिती करतो." तो आपले नेतृत्व कुणावरही लादत नाही, तर लोक त्याच्या कायार्तून प्रेरित होतात. "जसा राजा, तशी प्रजा" या उक्तीप्रमाणे समूह नेत्याच्या वर्तनाचे अनुकरण करत असतो. म्हणून नेत्याच्या कृती आदर्श असाव्यात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, 'नेता हा समाजाचा खराखुरा मार्गदर्शक असावा. तो स्वार्थी नसावा. दुसऱ्याच्या ओंजळीने पाणी पिणारा, भाडोत्री काम करणारा किंवा दिशाभूल करणारा नसावा.' नेता होण्यासाठी काही गुण प्रत्येकात आधीपासून असतात, काही गुण प्रयत्नाने विकसित करावे लागतात. कोणीही जन्मतःच नेता नसतो. जसजसे हे गुण विकसित होत जातील तसतसं आपलं नेतृत्व विस्तारत जातं. " प्रत्येकात असतो एक नेता!" हे १०० •/• खरं आहे. पडताळून पहा, मग समजेल...



**किशोर जाधव,** सोलापूर
- मो. नं. ९९२२८८२५४१

# दत्तकला ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्सला NAAC कडून 'B++' ग्रेड : प्रा रामदास झोळ

**करमाळा (कटूसत्य वृत्त):-** भिगवण - दत्तकला ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स फॅकल्टी ऑफ इंजिनिअरींग व फॅकल्टी ऑफ मॅनेजमेंट या महाविद्यालयास भारतीय उच्च शिक्षण मूल्यांकन आणि मान्यता परिषद (NAAC) कडून 'B++' ग्रेड मिळाल्याची महत्त्वाची घोषणा करण्यात आली आहे. या ग्रेडच्या प्राप्तीमुळे दत्तकला शिक्षण संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्ता, विदयार्थी केंद्रित सुविधा, तसेच उत्कृष्ट व्यवस्थापनाची गुणवत्ता पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे.



दत्तकला ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स हे आपल्या विद्यार्थ्यांना उत्कृष्ट शिक्षण देण्यास वचनबद्ध आहे. NAAC मूल्यांकन प्रक्रियेत संस्थेने शैक्षणिक, सामाजिक, आणि सांस्कृतिक विकासाच्या सर्व क्षेत्रांमध्ये आपली ताकद दाखवली आहे. 'B++' ग्रेड हा संस्थेच्या समर्पण, कौशल्य, आणि शिक्षक-विद्यार्थी सहयोगाची पावती आहे. या मूल्यांकन प्रक्रियेत शिक्षण पद्धती, संशोधन व विकास, विद्यार्थी कल्याण, शैक्षणिक साधनसंपत्ती, आणि विविध सामाजिक उपक्रमांचा समावेश केला गेला. संस्थेने 'B++' ग्रेड प्राप्त करून आपल्या स्थानिक आणि राष्ट्रीय स्तरावर एक महत्त्वपूर्ण शैक्षणिक संस्था म्हणून आपली ओळख निर्माण केली आहे. असे मत संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा रामदास झोळ यांनी व्यक्त केले.

दत्तकला ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स हे एक ग्रामीण भागातील प्रमुख शैक्षणिक केंद्र आहे जे विद्यार्थ्यांना उत्कृष्ट शिक्षण, प्रगतीशील सुविधा आणि उत्तम शिक्षकवर्ग उपलब्ध करीत आहे. दत्तकला शिक्षण संस्थेने नेहमीच कालानुरूप आपल्या शिक्षणाच्या पद्धतीमध्ये विविध सुधारणा केल्या आहेत आणि विद्यार्थ्यांना शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातून समृद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. NAAC कडून आलेल्या टीम ने संस्थेतील डिजिटल वर्ग खोल्या, सुसज्य प्रयोगशाळा, लॅब, आणि उत्कृष्ट संगणक कक्ष, विविध शैक्षणिक क्षेत्रांतील पुस्तकं, जर्नल्स, ई-लायब्ररी सेवा, आणि संशोधनासाठी आवश्यक संसाधनं, विद्यार्थ्यांना शारीरिक व मानसिक स्वस्थ मिळवण्यासाठी विविध क्रीडा सुविधा तसेच विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे, चांगली कॅन्टिन, वेलनेस सेंटर, करियर गाईडन्स आणि सर्वात महत्वाचे म्हणजे संस्थेने सामाजिक दायित्वाची जाणीव ठेवून विद्यार्थ्यांसाठी जे विविध समाजसेवी उपक्रम केले आहेत या सर्वांचे टीम कडून कौतुक करण्यात आले.

प्राचार्य डॉ. एस ए पाटील, प्रा. श्रीकांत साळुंके, सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांच्या कठोर मेहनतीमुळेच दत्तकला ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्सने ठअअउ कडून 'B++' ग्रेड प्राप्त केला आहे. त्यांचे शैक्षणिक, संशोधन आणि प्रशासनात्मक कार्य NAACच्या मूल्यांकन प्रक्रियेत महत्त्वपूर्ण ठरले. यामुळे संस्थेचा शैक्षणिक दर्जा राष्ट्रीय स्तरावर गौरवला गेला आहे, आणि संस्थेचा विश्वास आणि प्रतिष्ठा अधिक वाढली आहे असे मत संस्थेच्या सचिव सौ माया झोळ यांनी व्यक्त केले.

# रोहित सोनकवडे युरोपातील बेल्जियमला रवाना

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** "श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट" (स्वेरी) कॉलेज पंढरपूर येथून कम्प्युटर सायन्स ही पदवी घेतलेल्या रोहित विठ्ठल सोनकवडे यांना युरोप समूहातील बेल्जियम येथे काम करण्याची सुवर्ण संधी मिळाली आहे.



उच्च शिक्षण घेतलेल्या रोहित यांना बेल्जियम येथील कॉग्निझंट टेक्नॉलॉजी सोल्युशन्स कॉर्पोरेशन या कंपनीने त्यांना करारावर सेवा उपलब्ध करून दिली आहे. त्यांचे मोठे बंधू विकास सोनवणे हे सुप्रसिद्ध अशा सारस्वत बँकेत अधिकारी म्हणून काम पाहत आहेत.

सोनल लक्ष्मीदास सोनकवडे उपायुक्त इन्कम टॅक्स पुणे, प्रवीण विठ्ठल सोनकवडे (मॅनेजर) डॉक्टर रेड्डी फार्मा कंपनी. रघुनाथ तुळजाराम गायधनकर सामाजिक कार्यकर्ते -गुलबर्गा, अतुल बाबुराव कोकणे - महाराष्ट्र पोलीस यांनी रोहित यांच्या या परदेश दौऱ्यानिमित्त त्यांचे सोनवणे परिवार, मित्रपरिवार व समाजातील जेष्ठ नागरिकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# एकात्म मानवदर्शन हीरक महोत्सव जिल्हास्तरीय समितीमध्ये प्रशांत बडवे व ज्योती मोरे यांची निवड

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र शासनातर्फे पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या एकात्म मानव दर्शनाचा लोक कल्याणकारी विचार समाजातील सर्व घटकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी राज्याचे कॅबिनेट मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय एकात्म मानव दर्शन हीरक महोत्सव समिती स्थापन करण्यात आलेली आहे.

पंडीत दिनदयाल उपाध्याय यांचे कार्य, विचारप्रणाली व एकात्म मानव दर्शन, शालेय विदयार्थी, शिक्षक, महिला, शेतकरी, कामगार, सनदी लेखापाल आध्यात्मिक क्षेत्रातील महत्वाच्या व्यक्ती, इत्यादी घटकांपर्यंत पोहोचविण्या करीता किमान १ लाख पुस्तके प्रकाशित करणे, तसेच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, चित्रकला स्पर्धा यांचे आयोजन करणे. यासाठी राज्यस्तरीय समितीप्रमाणे जिल्हास्तरावर "एकात्म मानव दर्शन" हीरक महोत्सव समिती गठीत करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली हि समिती काम करेल. सोलापूरचे सामाजिक कार्यकर्ते, साहित्य, नाट्य इ क्षेत्रात उल्लेखनीय काम करणारे प्रशांत बडवे तसेच बार्शीच्या प्राध्यपिका, सामाजिक कार्यकर्त्या ज्योती मोरे हे या समितीमध्ये अशासकीय सदस्य म्हणून काम करतील.





## वात्रटिका

### रुसला पायलट

पायाला बांधून भोवरा
चालू आहे यांचा दौरा...
पायलट म्हणतो झोप येते
तुमचं जरा आवरा... ॥
यांनी आणि त्यांनीही केली
त्याला लय वेळ विनवणी...
लेट झाले जाणे त्यांचे आणि
फळाला आली मनधरणी... ॥

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# महर्षी शंकरराव मोहिते प्रशालेत गेट-टुगेदर उत्साहात संपन्न



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** शाळा म्हणजे केवळ शिक्षण देणारे ठिकाण नसून विद्यार्थ्यांच्या आयुष्याचा पाया रचणारी एक संस्कारशाळा असते. हेच दर्शन घडवणारा एक अनोखा क्षण यशवंतनगर येथील महर्षी शंकरराव मोहिते प्रशालेत अनुभवायला मिळाला. इ. बारावी (विज्ञान शाखा) बॅच 2002 मधील विद्यार्थ्यांनी तब्बल 23 वर्षांनंतर गेट-टुगेदर घेऊन जुन्या आठवणींना उजाळा दिला. विशेष म्हणजे, त्या काळातील सर्व शिक्षकांचा यथोचित सन्मान करून त्यांनी आपल्या शाळेचे उत्तरदायित्वही जपल्याचे एक उदाहरण घालून दिले.

कार्यक्रमात जुन्या विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांचा फुलांचा हार, श्रीफळ, सन्मानचिन्ह व भेटवस्तू देऊन सत्कार केला. या सत्काराने भारावलेल्या शिक्षकांनीही भावना व्यक्त करत आपल्या माजी विद्यार्थ्यांच्या यशस्वी वाटचालीबद्दल अभिमान व्यक्त केला. या सन्मानाने आमची मेहनत फळाला आल्याची जाणीव झाली, असे अनेक शिक्षक म्हणाले. यावेळी माजी मुख्याध्यापक खताळ सर, प्रा.कोरेकर सर, बी.व्ही.बाबर सर, आर.बी.पाटील सर, बाळू काटकर सर, डी.पी.देशमुख सर, पवार पाटील सर, आर.जी.जाधव सर, शिंदे सर, देशमुख मॅडम या शिक्षकांचा सन्मान करण्यात आला.

या गेट-टुगेदरनिमित्त विद्यार्थ्यांनी शाळेच्या प्रांगणात 15 फूट उंच असलेल्या चार वृक्षाचे रोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. याशिवाय विद्यार्थ्यांच्या मदतीने शाळेला नवीन तिन सिमेंट कॉंक्रीटचे बाकडे भेट देण्यात आले, जेणेकरून सध्याच्या विद्यार्थ्यांना उपयोग होईल.

विद्यार्थ्यांनीही आपल्या कार्यक्षेत्रातील यशोगाथा सांगताना शिक्षक व शाळेच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. अनेकांनी आपले बालपण, वर्गातील गमतीजमती, परीक्षेची धावपळ, आणि त्या काळातील शिक्षकांच्या आठवणी शेअर करून उपस्थितांनाही भावनिक केले.

मुख्याध्यापक संजय गळीतकर यांनी यावेळी शाळा राबवत असलेल्या 'विद्यार्थी हिताची बचत योजना', 'करिअर मार्गदर्शन उपक्रम', 'शिष्यवृत्ती योजना', आणि 'वृक्ष संगोपन अभियान' यांची माहिती दिली. तसेच त्यांनी सर्व माजी विद्यार्थ्यांना माजी विद्यार्थी मंडळात सक्रीय सहभागी होण्याचे आवाहन केले.

उपस्थित सर्व शिक्षकांनीही आपल्या मनोगतामध्ये सेवानिवृत्तीनंतरही आम्हाला बोलवून यथोचित सन्मान केल्याबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे आभार व्यक्त केले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक करताना, माजी विद्यार्थी हे शाळेचे खरे ब्रॅंड ॲम्बेसेडर असून, त्यांनी शाळेबद्दल दाखवलेली आत्मीयता ही आजच्या विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे, असे उद्गार काढले.

# भरडधान्याचे क्षेत्र वाढण्यासाठी राळा पिकाच्या विकसित वाणांच्या बियाण्याचे वितरण



**माढा (कटूसत्य वृत्त):-** आधुनिक कृषि तंत्रज्ञान आणि खरीप हंगाम पूर्व नियजण प्रसारासाठी विकसित कृषी संकल्प अभियान दि. २९ मे ते १२ जून २०२५ या दरम्यान सोलापूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये पोहोचवण्याचे काम महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरी अंतर्गत कृषी विज्ञान केंद्र मोहोळ, कृषी विभाग, महाराष्ट्र शासन आणि राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र सोलापूर, राष्ट्रीय भरड धान्य संशोधन संस्था, सोलापूर यांच्यामार्फत केले जात आहे.

दिनांक ०९ जून २५ रोजी माढा तालुक्यातील चिंचोली येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

सोलापूर येथील भारतीय भरडधान्य संशोधन केंद्र येथील शास्त्रज्ञ डॉ. परशुराम पत्रोटी यांनी मानवी आहारातील भरडधान्याचे महत्त्व विशद केले तसेच उपस्थित शेतकऱ्यांना त्यांच्याच केंद्रात विकसित केलेले राळ्याचे विकसित वाण CFXMV2 या भरडधान्याचे मोफत बियाणे वितरित केले.

डॉ. शिल्पा परशुराम यांनी डाळिंब पिकातील तेल्या रोग व डाळिंबामध्ये येणारा मर रोग याबद्दल शेतकऱ्यांनी कोणती काळजी घ्यावी आणि त्यासाठी वापरण्यात येणाऱ्या सर्व प्रतिबंधात्मक उपाय याविषयी तसेच राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्राच्या शिफारशींबाबत सखोल मार्गदर्शन केले. अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विषयाचे विषय विशेषज्ञ दिनेश क्षिरसागर यांनी कृषि मालाचे मूल्यवर्धन, दुग्ध प्रक्रिया, फळे व भाजीपाला प्रक्रिया उद्योग, कडधान्य प्रक्रिया, सेंद्रिय शेती प्रमाणीककरण आणि प्रधानमंत्री सुक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजना याविषयी सविस्तर माहिती दिली. पीक संरक्षण विषयाचे विषय विशेषज्ञ डॉ. पंकज मडावी यांनी बीज प्रक्रिया, खरीप हंगामातील कीड व रोग व्यवस्थापन, AI आधारित फेरोमॅन ट्रॅप्स,अशा विविध नवीन तंत्रज्ञानाबद्दल शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्यात आली. नॅनो युरिया आणि नॅनो डीएपी आणि माती व पाणी परीक्षण आधारित खत व्यवस्थापन याबद्दल उपस्थित शेतकऱ्यांना मृद विज्ञान व कृषि रसायन शास्त्रं विषयाचे विषय विशेषज्ञ काजल जाधव म्हात्रे यांनी माहिती दिली. कृषि अधिकारी गायत्री चव्हाण यांनी कृषि विभागाच्या विविध योजना विषयी सविस्तर माहिती दिली. इफ्को सोलापूर चे आकाश पाटील यांनी ड्रोन फवारणी तंत्रज्ञान व त्याचे फायदे नमूद केले.

याप्रसंगी चिंचोली चे सरपंच संतोष लोंढे, उप कृषि अधिकारी दादा पवार, सहायक कृषि अधीकारी शांताराम इंगळे हे उपस्थित होते. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुयोग ठाकरे, कृषि मित्र व ग्रामस्थ आदींचे सहकार्य लाभले.

# मोहोळ पोलीस ठाण्याची उल्लेखनीय कामगिरी

## जबरी चोरीसह ३ गुन्हे उघडकीस



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ पोलीस ठाणे हद्दीत चोरी व जबरी चोरी यांसारख्या गुन्हयाचे प्रकार घडुन गुन्हे दाखल झाले होते. सदरचे गुन्हे उघडकीस आणून प्रतिबंध करणेकामी अतुल कुलकर्णी पोलीस अधिक्षक, सोलापुर ग्रामिण व प्रितम यावलकर अप्पर पोलीस अधिक्षक, सोलापुर ग्रामिण यांनी पोलीस निरीक्षक हेमंत शेडगे मोहोळ पोलीस ठाणे यांना आदेशीत केले होते. त्यानुसार मोहोळ पोलीस ठाण्याच्या डीबी शाखेच्या पोलीस कर्मचाऱ्यांनी तीन गुन्ह्यांची उकल करत तब्बल तीन लाख सहा हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यामध्ये यश मिळवले आहे.

सदरची कामगीरी पोलीस निरीक्षक हेमंत शेडगे मार्गदर्शनाखाली पोउपनिरीक्षक अजय केसरकर, पोहेकों / दयानंद हैंबाडे, संदेश पवार, पोना/चंद्रकांत ढवळे, मपोना/मनिषा तरटे, पोकों/ अमोल जगताप, स्वप्निल कुबेर, संदिप सावंत, रोहन पवार, योगेश खलाटे, सुनिल पवार, अविराज राठोड तसेच सायबर पोलीस ठाणेकडील पोहेकों/युसुफ पठाण यांनी बजावली आहे.

# चार महिन्यांपासून वेतन नाही, रूग्णवाहिका चालकांवर उपासमारीची वेळ

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** एका बाजूला जिल्हा परिषद सोलापूर आरोग्य विभाग उच्च न्यायालय आदेशानंतर प्राथमिक टोलवाटोलवी सुरू असल्याने चालकांची उपासमार आरोग्य केंद्रातील ४ रूग्णवाहिका चालकांना १९ हजार ९०० रुपए प्रमाणे पगार देते अन इतर चालकांना वेटिंग वर ठेवते. दुसऱ्या बाजूला सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे चार महिन्यांपासून पगार देता आला नसल्याचे सांगत टेंडर प्रक्रिया सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे. न्यायालयीन प्रक्रियेत रूग्णवाहिका चालकांचे वेतन प्रलंबित असून,त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. दोन दिवसापूर्वी आषाढी वारी तयारीच्या अनुषंगाने ग्रामविकास मंत्री तथा सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी पंढरपुरात आढावा बैठक घेतल्यानंतर शासकीय विश्रामगृह येथे रूग्णवाहिका चालकांनी पालकमंत्र्यांची भेट घेतली.चालकांनी त्यांना निवेदन देत वेतनाचा विषय



मार्गी लावण्याची मागणी केली. मात्र, त्यांनी हा विषय आरोग्यमंत्र्यांकडील असल्याचे सांगून वेळ मारून नेण्याचा प्रयत्न केला. एकूणच रुग्णवाहिका चालकांची गेल्या काही महिन्यांपासून ससेहोलपट सुरू असून त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. सोलापूर जिल्हा परिषद आरोग्य विभागाच्या जिल्ह्यातील विविध प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी असणाऱ्या रुग्णवाहिकेवर चालक म्हणून ७७ जण कार्यरत आहेत. त्यांची नियुक्ती हंगामी स्वरूपात ठेकेदारांना मार्फत करण्यात येते. बहुतांश चालक हे गेल्या दहा वर्षांपासून सदर ठिकाणी कार्यरत आहेत. काही महिन्यांपूर्वी वेतन व इतर मागण्यांसाठी कर्मचारी उच्च न्यायालयात गेल्यानंतर त्या ठिकाणी किमान वेतनाप्रमाणे चालकांना पगार करावा असा आदेश दिल्यानंतर चार चालकांना १९ हजार ९०० रुपए याप्रमाणे वेतन जमा करण्यात आले. बाकी कर्मचाऱ्यांना अद्याप वेतन देण्यात आले नसल्याचा आरोप रूग्णवाहिका चालक संघटनेचे राहुल निंबाळकर यांनी केला आहे. एका बाजूला चालक पुरवठा करण्यासाठीची निवेदन प्रक्रिया सुरू करायची अन दुसऱ्या बाजूला कर्मचारी वेतनाचा विषयी न्यायालयात असल्याने वेतन देता येत नसल्याचे सांगायचे असा प्रकार आरोग्य विभागात सुरू असल्याचे पहायला मिळत आहे.सोलापूर जिल्हा परिषदेच्या विविध प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी रुग्णवाहिका चालक म्हणून बहुतांश चालक गेल्या दहा वर्षांपासून कार्यरत आहेत. रात्री अपरात्री २४ तास सेवा ते देत असतात. मात्र त्यांच्या मागण्यांकडे शासनाने दुर्लक्ष केल्याचे पहायला मिळत आहे.

# मागासवर्गीय मुलींनी शासकीय वसतीगृहात प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाअंतर्गत सोलापूर येथील मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतीगृह अशोक नगर सोलापूर हे शासकीय वसतीगृह कार्यरत आहे. सदर वसतीगृहात प्रवेशित विदयार्थ्यांना निवास व्यवस्था, भोजन व्यवस्था, शैक्षणिक साहित्य, निर्वाह भत्ता, खेळाचे साहित्य, वातानुकुलित संगणक कक्ष, सी.सी. टिव्ही कॅमेरे, शुध्द पिण्याचे पाणी, 24 तास सुरक्षारक्षक इ सोयी-सुविधा मोफत पुरवल्या जातात.

सदर वसतीगृहामध्ये शासन निर्णयानुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास प्रवर्ग, खुला, अपंग, अनाथ प्रवर्गनिहाय प्रवेश प्रक्रिया राबविली जाते. सन 2025-26 या शैक्षणिक वर्षाकरीता वसतीगृहातील रिक्त जागेवर इयत्ता 8 वी पासून ते उच्च/व्यावसायिक शिक्षणाच्या प्रथम वर्षासाठी प्रवेश घेतलेल्या विदयार्थ्यांना वसतीगृहाच्या प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने विदयार्थ्यांकडून प्रवेश अर्ज भरून घेण्यात येणार आहेत.

अर्ज भरण्यासाठी वेबसाईट - https://hmas.mahait.org अधिक माहितीसाठी संबंधित वसतीगृहाशी संपर्क साधावा असे आवाहन गृहपाल जगताप ए.यु. यांनी केले आहे.

# विभागीय व जिल्हास्तरावर डाक अदालतीचे आयोजन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** देशामधील पोस्टाची सेवा ही सामाजिक आर्थिक विकासाचा अभिन्न भाग आहे. देशातील प्रत्येक नागरिकांच्या मनामध्ये वास्तविकपणे पोस्टाच्या सेवेने एक वेगळ्या प्रकारचे स्थान निर्माण करुन प्रभावित केले आहे. पोस्ट खाते हे लोकांना चांगल्या प्रकारची सेवा देण्याचा व ग्राहकांचे जास्तीत जास्त समाधान करण्याचा प्रयत्न करते. ही सेवा देताना संभाषणामध्ये पत्रव्यवहारमध्ये किंवा सेवेमधील काही त्रुटीमुळे असे काही प्रश्न निर्माण होतात की, त्यामुळे पोस्टाच्या सेवेबद्दल तक्रार करण्याची वेळ येते. ग्राहकांच्या तक्रारीचा योग्य प्रकारे न्याय निवाडा करण्यासाठी पोस्ट खात्याने वेळोवेळी डाक अदालत घेण्याचे ठरविले आहे. त्यामध्ये पोस्ट विभागाचे अधिकारी तक्रार सोडविण्याचा प्रयत्न करतात.

प्रवर अधिक्षक डाक कार्यालय सोलापुर विभाग (सोलापूर हेड पोस्ट ऑफिस पाठीमागे) सोलापुर 413001 दारा दि.12 जून 2025 रोजी दुपारी 04.00 वाजता प्रवर अधिक्षक डाकघर सोलापुर यांच्या कार्यालयामध्ये 119 वी डाक अदालत आयोजित करत आहोत.

पोस्टाच्या कार्यपध्दतीविषयी किंवा कामकाजाचव्या तक्रारीचे निवारण सहा आठवड्याच्या आत झालेली नसेल व समाधानकारक उत्तर मिळाले नसेल अशा तक्रारीची या डाक अदालतीमध्ये दखल घेतली जाईल. विशेषतः टपाल स्पीड पोस्ट, कांउटर सेवा, डाक वस्तु, पार्सल, बचत बैंक तसेच मनिऑर्डरबाबतच्या तक्रारी विचारात घेतल्या जातील तक्रारीचा उल्लेख सर्व तपशीलासह केलेला असावा. उदा. तारीख व ज्या अधिका-याला मुळ तक्रार पाठविली आहे. त्या अधिका-याचे नाव, त्याचा हुदा इत्यादी. संबंधीतानी डाक सेवेबाबतची आपली तक्रार प्रवर अधिक्षक डाकघर, सोलापुर एस. एल. वी.ए. राव,विभागीय कार्यालय, सोलापुर - 413001 यांचे नावे दोन प्रतीसह दि. 12 जून 2025 पर्यंत किंवा त्यापुर्वी पोहोचेल अशा रितीने पाठवावीत, त्यानंतर आलेल्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

# ३० नोव्हेंबर रोजी बुरुड समाजाच्या वतीने मोफत विवाह सोहळ्याचे आयोजन



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** समाजसेवक विठ्ठलभाऊ सुपेकर यांच्या संकल्पनेतून व स्वखर्चातून, बुरुड समाजाच्या वतीने, मोफत सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती,विवाह सोहळा समितीच्या वतीने देण्यात आली.

बुरुड समाज मोफत सामुदायिक विवाह सोहळा, मोहोळ 2025 या अनुषंगाने, विठ्ठलभाऊ सुपेकर यांच्या संकल्पनेतून व स्वखर्चाने होणाऱ्या, सामुदायिक विवाह सोहळ्याचे नियोजन व समिती स्थापन करण्याच्या उद्देशाने,मोहोळ येथे मीटिंगचे आयोजन करण्यात आले होते. सदर मीटिंग मध्ये ३० नोव्हेंबर २०२५ रोजी संध्या.६ वा. २१ मि. श्रीराम मंगल कार्यालय व लॉन्स मोहोळ येथे बुरुड समाजाचा सामुदायिक विवाह सोहळा संपन्न होणार असल्याचे एक मताने निर्णय घेण्यात आला.

तत्पूर्वी या मीटिंगमध्ये आलेल्या सर्व पाहुण्यांचे संदीप शेंद्रे यांनी स्वागत केले व मान्यवरांच्या हस्ते मोहोळ गावचे ग्रामदैवत, श्री नागनाथ महाराज व बुरुड समाजाचे धर्मगुरू श्री केतय्या स्वामी यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले.तर चंद्रमोळी गणेश मंदिर स्वयंभू गणपती व श्री नागनाथ महाराज यांच्या मंदिरात जाऊन जाहिरात पत्रकाचे, पूजन करून देवा समोर ठेवण्यात आले.

यावेळी महेश सूर्यवंशी यांनी प्रस्ताविका मध्ये सामुदायिक विवाह सोहळ्याची, भाऊंनी संकल्पना कशा पद्धतीने मांडली ते सांगितले. तसेच आजपर्यंत झालेल्या तीन-चार मिटींगचा आढावा,सर्वांसमोर मांडला.तसेच ज्यांना विवाह सोहळ्याच्या वेगवेगळे समिती वरती घेण्यात आले आहे त्यांची नावे वाचून दाखवण्यात आली. यावेळी सूर्यकांत शेंद्रे, दशरथ वडतिले, महालिंग सावंत, राजेंद्र सूर्यवंशी व सोलापूर जिल्ह्यातील प्रत्येक तालुका अध्यक्षांनी आपले मनोगत व्यक्त केले. जिल्ह्यातून जास्तीत जास्त जुळलेले लग्न विवाह सोहळ्यामध्ये आणण्याचा प्रयत्न करणार व विवाह सोहळ्याची कोणतीही जबाबदारी द्या ते आम्ही चांगल्या पद्धतीने पार पाडू असे सर्व तालुका अध्यक्ष यांनी आश्वासन दिले.

या मीटिंगसाठी सोलापूर जिल्ह्यातून या विवाह सोहळ्याचे दानशूर व्यक्तिमत्व विठ्ठलभाऊ सुपेकर, राजेंद्र सूर्यवंशी सर, सूर्यकांत शेंद्रे, दीपक सूर्यवंशी, महालिंग सावंत, दशरथ वडतिले, हनुमंत पवार, राजू वडतिले, अमोल जगताप, संतोष मोरे, विनोद वडतिले, चेतन सुरवसे, ओंकार बुरुड, संतोष पवार, विठ्ठल साळुंखे, प्रल्हाद साळुंखे, शिवाजी रोहिटे, भारत वडतिले, प्रकाश रोहिटे, मल्लिकार्जुन वडतिले, विजय ता, सूर्यवंशी, सचिन वडतिले, युवराज सुरवसे, नितीन वडतिले, किरण सुरवसे या विवाह सोहळ्याचे मुख्य समिती महेश सूर्यवंशी, देविदास वडतिले, संदीप वडतिले, माणिक रोहिटे, ज्ञानदेव सुपेकर तसेच मोहोळ शहर बुरुड समाज व युवक हे सर्वजण उपस्थित होते.सदर मिटींगचे सूत्रसंचालनविठ्ठल साळुंखे यांनी केले व आभार सुपेकर यांचे नातू चि. सिद्धार्थ सुपेकर यांनी व्यक्त केले.

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अॅडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-

8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)

**अथर्व पेस्ट कंट्रोल**

An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी

प्रोप्रा. हरी सुभाष विरपे

9822964815
9421984815

झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण


**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतले श्री वटवृक्ष स्वामी महाराजांचे दर्शन



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):** श्री वटवृक्ष मंदिरात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. त्यांनी मंदिराच्या नूतनीकरण आणि परिसर सुशोभीकरणाबद्दल समाधान व्यक्त केले. शिंदे यांनी स्वामी समर्थांच्या ब्रीदवाक्याचा उल्लेख करत भाविकांना श्रद्धेचा संदेश दिला झ "भिऊ नकोस, मी तुज्या पाठीशी आहे." यावेळी मंदिर समितीच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. सोबतच, विधान परिषदेच्या उपसभापती नीलमताई गोऱ्हे, शिक्षण मंत्री दादाजी भुसे, जलसंधारण मंत्री संजय राठोड आणि शिवसेनेच्या अनेक पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. मंदिर समितीकडून गाभारा नुतनीकरण आणि सुशोभीकरण करण्यात आल्यामुळे भक्तांना प्रसन्नतेची अनुभूती मिळत असल्याचे शिंदे यांनी सांगितले. त्यांनी कुटुंबीयांसह पुन्हा निवांत स्वामी दर्शन घेण्याचा शब्द दिला.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) राजकुमार (इंग्रजीत) २) काम करताना टाळाटाळ करणारा ३) चोऱ्या करणारा ४) जीव, जंजीर चित्रपटातील एक अभिनेता ५) गोलमाल चित्रपटातील एक अभिनेता ६) दूध मोजण्याचे प्रमाण ७) एक त्वचाविकार ११) ** सहकार नाही उध्दार १२) वाल्मिकी ऋषींनी लिहिलेला ग्रंथ १३) मुस्लीम बांधवांचा पवित्र महिना १७) एक इंग्रजीत) १८) बॉडीगार्ड (मराठीत) २३) ताणला जाणारा एक पदार्थ २४) जाणकार, माहिती असलेला २५) झाडावर उलटा लटकणारा पक्षी २७) उपवासादिवशी शाबुदाण्याची खाण्यासाठी बनवितात ती २९) एक मद्य ३०) गुणी, होतकरू, प्रामाणिक ३१) श्रीमंत (हिंदीत), शाहरूखचा एक चित्रपट ३४) देवाने दिलेला आशिर्वाद ३६) स्त्री ३८) पाच+दोन ३९) फटाक्यांची माळ, शिक्षकांना या नावाने संबोधतात ४०) पुराणकालीन अश्व जोडलेले वाहन

**आडवे शब्द :**
१) परदेशी गायकाशी विवाहबध्द झालेली फॅशन चित्रपटातील अभिनेत्री
५) भारतीय महिला क्रिकेट टीमची एक माजी कर्णधार
८) जीवनच्या विरूध्दार्थी
९) तुमच्या हातातील लिहिण्याची वस्तू १०) शासकीय सुटीचा वार
१२) राजनीती, पॉलिटिक्स १४) एक पेय
१५) मुलीची मुलगी १६) विदेशी मद्य
१७) वाकडे, बाकदार १९) फळातील बीज, बियाणे
२०) होमहवन करताना पेटविलेला अग्नीकुंड, याग
२१) नवीन (ग्रामीण भाषेत) २२) उष्ण, तप्त २४) मनुष्य
२६) देव (हिंदी), एक चित्रपट- ** ने बना दी जोडी
२८) चेष्टा करणे, मस्करी ३०) निरक्षरच्या विरूध्दार्थी ३१) चांदी ३२) वाईट
३३) नशीब (इंग्रजीत) ३४) खाद्यपदार्थाचा चौकोनी तुकडा ३६) सम उलट लिहा
२७) रसरशीत ३९) सैन्याचा प्रमुख, सेनापती
४१) एक संत- वामनराव *
४२) अकलुज या जिल्ह्यात आहे ४३) स्त्रियांचा नाकातील दागिना

## सुडोकु - 271

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 5 | | 6 | 7 | 2 | | | |
| 2 | | | | | | 6 | | |
| 4 | | 9 | 8 | | 1 | 2 | | |
| | 2 | | | 9 | | | 5 | |
| 5 | 7 | 3 | 2 | 8 | 4 | | | 9 |
| | 4 | | | 5 | 7 | | 2 | 3 |
| 6 | | | 4 | | 5 | | | 7 |
| 8 | | | | | 3 | 4 | | |
| | 3 | 4 | 9 | | 8 | | | 6 |

